186

SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

November 2021, Special Issue 03, Vol. IV

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54

November 2021 Special Issue 03 Vol. IV

# *Akshara Multidisciplinary Research Journal*

**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**Special Issue 3 Volume IV**

**November 2021**

AMRJ

*Akshara Publication*

Plot No 143 Professors colony,

Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201

Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54

November 2021 Special Issue 03 Vol. IV

## Index



| Sr.No | *Title of the Paper* & Author's Name | Pg.No |
|---|---|---|
| 1 | भटक्या विमुक्तांच्या साहित्याचे स्वरूप - प्रा. डॉ. दत्तात्रय महादेव डांगे | 05 |
| 2 | साठोत्तरी साहित्य प्रवाहांची सामाजिकता - डॉ.रमेश अर्जुन शिंदे | 10 |
| 3 | साहित्यातील भटक्या व विमुक्त जाती जमातींचे चित्रण एक अभ्यास - प्रा. दिलीप महादू कोने | 13 |
| 4 | भटक्या श्रमिक धनगर स्त्रियांचे साहित्य जात्यावरील ओवी - प्रा.डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | 16 |
| 5 | भटक्या विमुक्तांची आत्मकथने सामाजिक वास्तवाचे प्रभावी स्वकथन - डॉ. विद्या विजय नावडकर | 20 |
| 6 | स्त्रीवादी साहित्यातील शोषित वंचित स्त्रियांचे चित्रण - प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | 25 |
| 7 | शोषित आणि वंचितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दलित कथावाङ्मयासमोरील आव्हाने - प्रा. मोहन चव्हाण | 29 |
| 8 | स्त्री जन्मा तुझी हीच कहाणी एक सामाजिक चिंतन - प्रा. स्वाती मगदूम | 32 |
| 9 | नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी - प्रा. डॉ. सोनू लांडे | 35 |
| 10 | दलित साहित्य : काही विशेष - डॉ. सर्जेराव पद्माकर | 40 |
| 11 | स्त्रियांचे नियतकालिकांतील वैचारिक लेखन - डॉ. तेजस तानाजी चव्हाण | 43 |
| 12 | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित आत्मकथनाची वैशिष्ट्ये - डॉ. विजय रेवजे | 47 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासंबधीचे विचार - श्री. सुहास बापू मोरे | 50 |
| 14 | अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा कादंबरीतील आशयविश्व व समाजदर्शन - प्रा.डॉ.सुभाष दिनकर आहेर | 52 |
| 15 | श्रमिक साहित्याची धगधग : नारायण सुर्वे यांच्या कविता - श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे | 56 |
| 16 | दलित आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार डॉ. गंगाधर पानतावणे - प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 60 |
| 17 | सुनील अवचार यांच्या कवितेतील वंचित शोषितांचे चित्रण - डॉ. मगदूम बळवंत | 63 |
| 18 | दिनकर गायकवाड यांच्या साहित्यातील शोषित आणि वंचितांचे चित्रण - प्रा. डॉ. सुनील जगन्नाथराव निगडे | 66 |
| 19 | कृष्णराव भालेकर यांच्या कवितेमधील श्रमिकांचे चित्रण - प्रा. डॉ. तानाजी अंबादास देशमुख | 69 |
| 20 | नामयाची जनी जगण्याचा आधार : अनुभव नव्हे प्रासंगिकता - प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | 73 |
| 21 | 'आंदकोळ' आत्मकथेमधील वास्तवदर्शन- प्रा. डॉ. संगीता पैकेकरी | 76 |
| 22 | 'निशाणी डावा अंगठा' कादंबरीतील समस्या - प्रा. डॉ.बाबासाहेब पिरंगोंडा नाईक | 80 |
| 23 | 'सल ' दलित काव्यसंग्रहातील समाज चित्रण - प्रा. सुहास मुरलीधर उपडे | 82 |
| 24 | 'मरणकळा' आत्मकथनातील सामाजिक विषमतेचे चित्रण - प्रा.डॉ.कांचन विजय नलवडे | 85 |
| 25 | हिंदी उपन्यास साहित्य में किसानों का चित्रण- प्रा. विश्वनाथ चंद्रकांत पटेकर | 88 |
| 26 | भगवानदास मोरवाल का साहित्य : शोषित कृषक की दास्ताँ- डॉ. गणेश शेकोकर | 91 |
| 27 | हिन्दी दलित कहानियों में दलित परिवेश का चित्रण- विप्रा जनार्दन राऊळ | 95 |
| 28 | जयप्रकाश कर्दम के उपन्यासों में दलित चित्रण ('छप्पर' उपन्यास के विशेष संदर्भ में) - डॉ. भारत श्रीमंत खिलारे | 98 |

E- ISSN 2582-5429
AMRJ Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

20

# नामयाची जनी जगण्याचा आधार : अनुभव नव्हे, प्रासंगिकता

प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, ता.- बार्शी, जि. सोलापूर
मोबा. नं 7588020290 email. -vishallingayat28@gmail.com

प्रस्तावना :- 'स्त्रीवाद' हा असा विचारप्रवाह आहे की जो स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाचे, शोषणाचे, लाभलेल्या बंधनांचे, गुलामगिरीचे व दुय्यमत्त्वाचे स्थान या संबंधीचे नवे आकलन करून देणारा विचारप्रवाह आहे. 'स्त्रीवाद' हा इ. स. १९६० नंतरच्या दशकात वेगाने पुढे येणारा साहित्य प्रवाह आहे. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीला कधी देवता बनवून तिचे मनुष्यत्व नाकारले, तर कधी तिला शोभेची बाहुली बनवून तर कधी एक भोगवस्तू म्हणून पाहिले. कधी तिला मदनाची पुतळी म्हणून, कधी तिला दासी, कुलटा, व्यभिचारिणी म्हणून हीन लेखले. स्त्रीवाद समजून घेण्यासाठी स्त्रियांना समाजामध्ये मिळणाऱ्या दुय्यम स्थानाविषयीचे विचार समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. 'स्त्रीवाद' म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे होय. आपण एक माणूस आहोत याची जाणीव होणे, आपले शोषण होते आहे याची तिला जाणीव होणे, तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्वासाठी संघर्षप्रवण होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद म्हणजे काय.? "भांडवलशाहीतून परिणत झालेला वर्गलढा आणि लैंगीक श्रम विभागणीतून झालेली स्त्री-पुरुष विषमतेची परिणती यांची सांगड मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली जाते." [१] स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे होय. स्वतःचे हक्क कळणे होय. आपण एक माणूस आहोत याची जाणीव होणे म्हणजे स्त्रीवाद होय. "स्त्रियांच्या म्हणून पुरुषांपासून वेगळ्या असलेल्या जाणीवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाङमयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते." [२]

महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, बहिणाबाई, सोयराबाई, निर्मळा आणि जनाबाई इत्यादी संत कवयित्रींनी तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इत्यादी लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेचे तसेच स्त्रियांवरील अन्यायाचे जुलुम-शोषण व त्यातून स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले आहे. "मल्लिका अमरशेख यांच्या काव्यातील प्रतिमासृष्टी तर स्त्रियांच्या कवितेला वेगळ्या वळणावर घेऊन आली आहे. त्यांनी मराठी कवयित्रींच्या कवितेतील भाषा नुसती बदलली नाही, तर त्यात प्रचंड उलथापालथ घडवून आणली आहे." [३] विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, कविता महाजन, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर, सानिया, नीरजा यांच्या कथा-कादंबरी व ललित लेखनाने मोलाची भर घातली आहे. कमल देसाईंच्या 'काळासूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' (१९७५) या कादंबरीत प्राचीन मिथक कथांना नवे स्त्रीवादी आयाम दिले आहेत. तर "कवयित्री नीरजा हिने द्रौपदी पांचालीच्या दुःखातून स्वतःच्या शरीरालाच प्रश्नांकित करणारी भाषा वापरली आहे." [४]

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भावविश्वात संत जनाबाईंना महत्त्वाचे स्थान लाभले आहे. संत जनाबाई हे नाव उच्चारले की आपल्या सरावलेल्या कानांना, डोळ्यांना आणि मनालाही 'नामयाची जनी' हेच संबोधन लक्षात येते. जनाबाईंच्या अभंगात त्यांनी केलेल्या काबाडकष्टाची, दगदगीची, श्रमाची वर्णने येतात. जाते धरणे, कांडणे, सारवणे, धुणी-भांडी करणे अशी सगळी कामे जनाबाईसाठी स्वतः पांडुरंग करतो, अशी एक धारणा आपल्याकडे पिढ्यानपिढ्या चालत आली आहे ती स्वाभाविक आहे. कारण संत जनाबाईंच्या अनेक अभंगातून त्याचे परिमाण पहावयास मिळते. जसे की, "दळीता कांडिता त्या विठ्ठलमय झाल्या स्वतःचं दासीपण, जनीपण विसरून विठ्ठलरूप झाल्या." [५] भागवतधर्म मंदिराच्या पायाभरणीत संत जनाबाईंचा हातभार

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

महत्त्वाचा आहे. संत नामदेवांबरोबर युगानुयुगे नाते सांगणाऱ्या जनाबाई खऱ्या अर्थाने श्रम देवताच होत्या. ईश्वराची साधना करण्यासाठी, संसार प्रपंचाचा त्याग करून कड्या-कपाऱ्यात वास करण्याऐवजी नित्याची कर्मे करता-करता, हसत-खेळत सहजपणे भक्ती करता येते. असे जीवनाभिमुखतेचे तत्वज्ञान त्या सांगतात. आपल्या एका अभंगात त्या म्हणतात...,

"दळू कांडू खेळू | सर्व पाप ताप जाळू ||
सर्व जीवांमध्ये पाहू | एक आम्ही होऊन राहू ||" ६

नामदेवांची दासी या भूमिकेशी जनाबाई इतक्या एकरूप झालेल्या होत्या की, हे नाते जन्मोजन्मीचे असल्याचे त्यांना वाटते. जनाबाईंनी सगुण-निर्गुण, द्वैत-अद्वैत, भक्ती-ज्ञान, शैव-वैष्णव, सवर्ण-शूद्र, स्त्री-पुरुष यांची यशस्वी सांगड घातली. हे सगळं करत असतांना मात्र जनाबाई रमल्या त्या खेडोपाड्यातील निरक्षर, कष्टकरी बायाबापड्यांमध्ये. विश्वातील आजपर्यंतच्या सर्व कष्टकरी स्त्रियांच्या त्या प्रथम प्रतिनिधी आहेत. उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखवतांना भक्तीच्या बळावर 'पंधरावी ती दासी जनी' असे स्वतःचे महत्त्वपूर्ण स्थान त्या दाखवतात. संत जनाबाईंच्या ४५० अभंगांमधून नाममहिमा, गुरुमहिमा, संतमहिमा, पंढरीमहात्म्य,बाळक्रीडा, स्वानुभव इत्यादी अनेक विषय आलेले आहेत. देवाशी एकरूप होऊनही माणसांकडून ज्यांच्या वाटेला उपेक्षित जिणं आलं, त्या जनाबाईंचा खडतर प्रवास आजही संपलेला नाही. संत नामदेवांच्या घरी दासी म्हणून त्यांचं उभं आयुष्य संपलं. शेणगोठा, भांडी धुणे, कपडे, दळणकांडण, झाडलोट अशा त्यांनी जन्मभर केलेल्या कामाचा वारसा चालवणाऱ्या महिला आजही आहेत. "आपल्यापैकी अनेकांच्या घरात आहेत, पण फक्त त्यांचं जनाबाईशी नातं सर्रास सांगण्याची पद्धत आपल्याकडे नाही त्यामुळे ते आपल्याला कळू शकत नाही." ७

मराठीच्या आदिकाळात ज्या श्रेष्ठ संतस्त्रिया झाल्या त्यात नामदेवांची जनी अर्थात शिष्या जनाबाई यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. जनाबाईचा जन्ममृत्यू, आई-वडील, मूळगाव, पूर्व जीवन निश्चितपणे सांगता आले नाही, तरी त्या पंढरपुरात संत नामदेवांच्या परिवारात सामावून गेल्या होत्या आणि त्यांनी उत्कट विठ्ठलभक्तीची भावकविता लिहिली हे निर्विवाद आहे. स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावें उदास | साधुसंत ऐसें केले मजी | अशी जनाबाईंची दृढ श्रद्धा आहे." ८ आई-वडिलांनीच दिलेले पोरकेपण, उपेक्षित जीवन असे एका मोलकरणीचे आयुष्य वाटेला आलेल्या जनाबाईंना किती त्रास सहन करावा लागला. त्यांच्या नशिबात काबाडकष्ट तर होतेच पण त्यासोबत त्यांच्यावर चोरीचा आळ आला जनाबाईवर घेण्यात आलेला चोरीचा आळ हा त्यांच्या चरित्रातील महत्त्वाचा प्रसंग आहे. चोरीचा आळ घेऊन एकट्या जनाबाईवर चाळीस ब्राह्मण धावून येतात आणि देवाला त्याचे काही नाही. यावरून 'विठो मेला' असे लिहिणे हे जनाबाई आणि विठोबाचे तादात्म्यच आहे असे नव्हे, तर रूढ कल्पनांना धक्का लावत प्रत्यक्ष देवाचीही गय न करणाऱ्या जनाबाई येथे दिसतात. हजारो वर्षे धर्माने घालून दिलेली मर्यादा, आखून दिलेली लक्ष्मणरेषा उधळून लावण्याचे काम ही दासी जनी करत होती. विद्येचा अधिकार नसतांना शूद्र जनाबाई लिहित होत्या, गात होत्या, आपले विचारधन इतरांना वाटत होत्या. त्यामुळे तत्कालीन ब्राह्मण पंडितांचा रोष, शिव्याशाप त्यांना सहन करावा लागत होता. त्यांच्या या संघर्षात्मक भूमिकेचा सुंदर आविष्कार त्यांच्या 'डोईचा पदर आला खांद्यावरी' या अभंगातून व्यक्त झाला आहे. आपल्या या अभंगात त्या म्हणतात..,

"डोईचा पदर आला खांद्यावरी |
भरल्या बाजारी जाईन मी ||
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा |
आता मज मना कोण करी ||" ९

साडेसातशे वर्षापूर्वी या महाराष्ट्रात ज्या संत महात्म्यांनी भक्तीभावाची, ज्ञानाची व प्रबोधनाची जी विलक्षण लोक चळवळ सुरू केली, त्यामध्ये संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत बहिणाबाई, संत निर्मळा या संत कवयित्रींनी निर्भयपणे व अतिशय धाडसाने जे योगदान दिले ते अभूतपूर्व आहे. यामध्ये विशेषतः संत जनाबाईचे कार्य म्हणजे सावित्रीबाई फुले यांनी भारताच्या स्त्री जीवनात जी अभूतपूर्व क्रांती केली, त्याचे प्रथम रणशिंग होय." १०

**संदर्भटीपा :-**

१) जाधव मनोहर, (संपादक) 'समीक्षेतील नव्या संकल्पना', स्वरूप प्रकाशन - औरंगाबाद, २००१,प्र.आ. पृष्ठ - १२९

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

२) लिंबाळे शरणकुमार, 'साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन- पुणे, २००७, प्र.आ. पृष्ठ -१५२
३) सरकटे सदाशिव, '१९८० नंतरची स्त्रीवादी कविता, चिन्मय प्रकाशन - औरंगाबाद, २०११, प्र.आ. पृष्ठ -१०६
४) लिंबाळे शरणकुमार, उ.नि. २, पृष्ठ - १७०
५) परब सचिन / गायकवाड श्रीरंग, (संपा.) 'जनाई', लेख- भवाळकर तारा, 'एक अनोखा सवती मत्सर', अक्षरमुद्रण व प्रकाशन संस्था- आजरा, एप्रिल २०१६, पृष्ठ- ४०
६) तत्रैव, लेख- मोरे सदानंद, 'जनी म्हणे', पृष्ठ- ३०
७) तत्रैव, लेख- पेठकर रूपाली, 'दळिता कांडिता', पृष्ठ- १२३
८) तत्रैव, लेख- कामत अशोक, 'पंधरावी ती जनी', पृष्ठ- १५९
९) तत्रैव, लेख- मिरजकर श्यामसुंदर, 'मनगटावर तेल घाला', पृष्ठ- ५७
१०) तत्रैव, लेख- सासवडे मंगला, 'विठू माझा लेकुरवाळा', पृष्ठ-६६

■ ■ ■